!! श्री गणेशाय नमः !!
!! श्री लक्ष्मीकांत प्रसन्न !!
!! श्री बंदिजाईनी प्रसन्न !!

# स म वे त




# जानेवारी २०२२

Designed & Printed by - Vidya Mudran Mandir, Vidyadhar Keshav Kelkar, ☎ 9757142636 / 8369093247

# कालिंदी. . .

दिनांक ४ मार्च, २०२१, रोजी अवधूतानंद अर्थात श्री. जगन्नाथ कुंटे स्वामी गेल्यानंतर त्यांचं "कालिंदी" हे पुस्तक वाचण्याचा योग आला. त्यांची नर्मदे हर हर, साधना मस्त, धुनी, नित्य निरंजन, प्रकाशपुत्र ही पुस्तकं आवडल्याने, हे पुस्तक उशीराने का होईना पण तेवढ्याच आनंदाने आणि उत्सुकतेने मी वाचण्यास सुरुवात केली. "कालिंदी" ही कथा आहे स्वामी आणि पूर्वाश्रमीची त्याची पत्नी कालिंदी हिची. एका सामान्य स्त्रीने प्रपंचात राहून, संन्यासी वृत्तीने जगत अध्यात्मिक उन्नतीच्या केलेल्या प्रवासाची ही कहाणी आहे. परमेश्वरावर असलेल्या भक्ती आणि श्रद्धेच्या जोरावर आयुष्यातील दु:खांना सामोरं जात आत्मकल्याणाचा मार्ग प्रशस्त कसा करावा हेच कालिंदीच्या या प्रवासातून आपल्याला शिकायला मिळतं. अध्यात्मिक मार्गावरील स्त्री अथवा पुरुष अशा कोणत्याही साधकासाठी हा प्रवास प्रेरणादायी व मार्गदर्शक असा ठरतो.

वाचकांसमोर कालिंदी आणि स्वामीची गोष्ट सांगताना लेखकाने प्रारब्ध, वैराग्य, श्रद्धा, भक्ती, साधना, नामस्मरण, प्रेम, सात्विकता, संन्यासी वृत्ती यांसारख्या वेगवेगळ्या गोष्टींवर खूप साध्या, सोप्या पण प्रसंगी तितक्याच परखड भाषेत भाष्य केले आहे. हे भाष्य अध्यात्मिक मार्गात नुकताच प्रवेश केलेल्या किंवा पुढे जाऊन प्रसंगी गोंधळून गेलेल्या साधकांना अतिशय योग्य असे दिशादर्शकच म्हणावं लागेल.

देव कठोर नसून माणसाचं प्रारब्ध कठीण असतं. ते भोगूनच संपवावं लागतं. प्रारब्ध भोगताना मनात नामस्मरण करत आणि साधनेचा दिवा अखंड सांभाळत प्रवास करावा लागतो. देव काही प्रारब्ध बदलू शकत नाही. प्रारब्धानुसार सगळं काही होत असतं. दारिद्र्य हा शाप असला तरी श्रध्दा आणि कष्ट हा त्या शापावरचा उःशाप म्हणावं. हे सांगताना लेखकाने पुस्तकात स्वामी आणि कालिंदीच्या लग्नानंतरच्या सहजीवनातले खडतर अनुभव वर्णन केले आहेत.

संन्यासी वृत्ती कशी असावी हे सांगताना लेखक म्हणतात की प्रपंचातून पळून जाऊन संन्यासी होणं सोपं. पण संन्याशाचे भगवे वस्त्र न घालता, प्रपंचात राहूनच मनाच्या आकाशात मुक्त राहणे, झोकून देणे हे खरे कौशल्य. आसक्ती संपली की माणूस वृत्तीने खरा संन्यासी होतो. ही मनाची अवस्था आहे. आसक्तीचा, वासनेचा मृत्यू झाला की जगण्यातला आनंद अनुभवता येतो. स्वामी संन्यासी होता पण कालिंदी वृत्तीने संन्यासी होती.

कालिंदीमध्ये सात्विकतेचे तेज होते. सात्विकता म्हणजे भ्याडपणा नव्हे. सात्विकतेपुढे मुळातच आक्रमक, दिखाऊ पण भित्रा असलेला अहंकार गळून पडतो. सात्विकतेच्या अमर्याद शक्तीने स्वतःमधला कृष्ण प्रकट करता आला पाहिजे असं लेखक म्हणतात.

श्रद्धेची शक्ती डोक्यावरील दुःखाच्या गाठोड्याचे ओझे हलके करते. परंतु श्रद्धेच्या परीक्षेत ऐहिक सुखाची अपेक्षा ठेवणे योग्य नाही. जितकी संकटं अधिक तितकीच श्रद्धेची शक्ती बळ देते. तिच्या जोरावर दारिद्र्याचा नाश शक्य आहे. वेळ लागेल, कष्ट पडतील पण सबूरी हवी. चांगली स्वप्नं खरी करण्याची जिद्द हवी.

प्रत्यक्ष कृती महत्त्वाची. कष्ट करण्याची वृत्ती असली की लक्ष्मी दूर राहत नाही. फक्त त्यासाठी बुद्धीला कृतीची जोड हवी. सकारात्मक विचार जगण्याला बळ देतो. प्रत्येक माणसात चैतन्याची, तेजाची मूर्ती असतेच. फक्त वरवरचे आसक्ती, वासना, अहंकाराचे तुकडे साधनेचे घाव घालून उडवावे लागतात. घाव सोसले की चैतन्याचा साक्षात्कार होतोच. श्रद्धा असली की देवत्व प्रकट होतंच असं श्रद्धेविषयी सांगताना लेखक म्हणतात.

स्वामीने संन्यास घेतल्यानंतर, घर सोडून कालिंदीने नर्मदा किनारी जाऊन केवळ श्रद्धेच्या जोरावर कुठल्याही फळाची अपेक्षा न करता आपल्या निर्धाराने, आपुलकीने, आपलेपणाने, विवेक जागृत ठेवून एक गाव नव्याने उभारलं होतं. इथे भाव महत्त्वाचा होता.

साधनेबद्दल मार्गदर्शन करताना लेखक म्हणतात की, साधनेची ओढ महत्त्वाची. बाह्य दिखाव्यापेक्षा गुरुशी आतून समरस व्हायला हवं. आपलं काम ही सुद्धा साधनाच. ध्यानाला बसल्यावर अंतःकरणातल्या अहंकाराची, वासनेची आसक्तीची राख व्हायला हवी. न-मन अवस्था व्हायला हवी. ज्ञानाचे प्रदर्शन न करता ते स्वतःशीच सिद्ध करावे. साधनेच्या वेडात अहंकार जळून गेला की साधक जिवंत होतो. उरतं ते केवळ चैतन्य. साधना आपण करत नाही तर सद्‌गुरू आपल्याकडून करवून घेतात. त्यासाठी रोज ध्यानाला बसणं, गुरूला शरण जाणं, स्वतःला त्यांच्या स्वाधीन करणं महत्त्वाचं. यासाठी शरीर ताजं हवं. थकलेलं शरीर साधनेच्या क्रिया पेलू शकत नाही. दिवसभराचा शीण गेला की मग रात्रीची साधना तीव्र होते. चैतन्याशी फुगडी खेळण्यासाठी शरीरात उत्साह हवा.

नामस्मरणाविषयी लेखक लिहितात की नामस्मरण ही एक तपस्या आहे. नामस्मरणात मन इतकं गुंतवून ठेवलं पाहिजे की भुकेची जाणीवही होता कामा नये. आसक्ती, अहंकार अशा सर्व प्रकारच्या वेगवेगळ्या भुका मरून प्रतिष्ठेची लक्तरे गळून पडली पाहिजे.

वैराग्याबद्दल मार्गदर्शन करताना लेखक लिहितात की उपेक्षा आणि वैराग्य हा साधुत्वाचा पाया आहे. वैराग्य हेच साधूंचं आसन. प्रत्येक स्त्रीमध्ये कामुकता पाहण्याऐवजी मातृत्व दिसायला हवं. आपण हातात घेतलेल्या कामाचीही आसक्ती नको. कर्माची कठोरपणे साधना करताना त्याच्या आसक्तीतून बाहेर पडणं हे तेवढंच महत्त्वाचं आहे.

साधकाच्या मनाची अवस्था वर्णन करताना लेखकाने सांगितले आहे की,साधनेच्या वेळी मनाची अवस्था स्थिर व्हायला हवी. त्या वेळी चैतन्याची जाणीवही नाहीशी होते. काहीच उरायला नको. देहमनाची आहुती देऊन अहंकाराची, वासनांची, प्रतिष्ठेची वस्त्रं टाकून देऊन खऱ्या अर्थाने शून्य व्हाव लागतं. प्रतिकूल परिस्थितीत मनाचा तोल, मनाची शांतता सांभाळण्याची सवय लावून घेणे गरजेचे आहे. एकदा मनाला आवर घातला की मग शरीर दुय्यम ठरतं. या ठिकाणी विवेक महत्त्वाचा. मनाचा हा वेग आवरण्याचा उत्तम उपाय म्हणजे नामस्मरण. साधकाचं मन अवहेलना सहन करताना खंबीर आणि शांत झालं पाहिजे. त्याने निंदा आणि स्तुतीत समभावाने वागलं पाहिजे. मनाला देवाच्या चरणाशी ठेवून समाधानी आयुष्य जगावं.

स्वामी खंबीर स्वभावाचा, कष्टाळू पण हळवा होता. दैन्य म्हणजे काय असतं हे त्याने आयुष्यभर अनुभवलं होतं. जंगल उभारावं हे स्वामीचं स्वप्न होतं.

श्री. शंकर महाराज त्याच्यासाठी सर्वस्व होते.

आपल्या पतीला अर्थात स्वामीला आणि तिन्ही मुलांना स्वतंत्रपणे जगू देणारी, एका गावाचा उद्धार करणारी, स्वतंत्र जगणारी, जंगल उभारणारी, पक्षीमित्र, सर्पमित्र, अरण्यमित्र, गावकऱ्यांची नानी आणि गावातल्या शिल्पकाराची गुरूनानी असलेली कालिंदी कठोरपणे लढणारी, प्रेमाने जगणं सहज शक्य करणारी, नेहमीच विवेकाने वागणारी अशी होती. स्वामीविषयी कितीही प्रेम असलं तरी त्याच्या साधनेच्या आड आपलं शारीरिक आकर्षण येऊ नये म्हणून त्याला स्वत:पासून दूर ठेवणाऱ्या कालिंदीचं स्वामीवर आयुष्यभर प्रेम होतं. पण ते शारीरिक पातळीच्याही पलीकडे जाऊन मानसिक पातळीवर होतं. वेगवेगळे विश्व असणारी ही दोघं आयुष्याच्या उत्तरार्धात मनाने एकरूप झाले होते. कालिंदी स्वामीमय झाली होती. स्वामीची सगळी स्वप्नं कालिंदीने जिद्दीने, हळूहळू बदल घडवत भक्तीच्या सामर्थ्याने पूर्ण केली होती. आयुष्याच्या शेवटी तिची स्वामीप्रती असलेली दर्शनाची ओढ, तिची शेवटची इच्छा म्हणून श्री. शंकर महाराजांनी साधनेतून अवकाश भ्रमण मार्गे पूर्ण केली.

कष्टाच्या मार्गाने गावकाऱ्यांमध्ये चैतन्य निर्माण करणाऱ्या, अन्न, वस्त्र, पैसा अशा सर्वच गोष्टींमध्ये त्यांना स्वावलंबी करणाऱ्या, त्यांना साधनेचा मार्ग दाखवणाऱ्या, तिच्या श्रद्धेच्या शक्तीने एक मोठं गाव उभारणाऱ्या कालिंदीची शेवटची मागणी काय होती तर ती मेल्यानंतर गावात तिची कुठलीच खूण ठेवू नये. कुठलाही खर्च न करता, कुठलेच विधी न करता तिची रक्षा नर्मदामाई जवळ अर्पण करावी. या मागणीतूनच कालिंदीच्या मनाचा मोठेपणा लक्षात येतो तिच्यातील वैरागी वृत्ती,

संन्यासी भाव, आसक्तीरहित जगणं लक्षात येतं. खरंच साधकाबरोबरच कुठल्याही सामान्य माणसालाही यातून किती शिकण्यासारखं आहे!

आयुष्याच्या संध्याकाळी परमेश्वराच्या भक्ती मार्गावर पावलं टाकताना पूर्णपणे रिकामं, रितं होऊन चालायला हवं. साधनेच्या मार्गाने सगळे विकार जाळून टाकून भगवंताशी एकरूप होण्याचा प्रयत्न करायला हवा. नामस्मरण आणि साधनेच्या मार्गाने सतत आत्मकल्याणाचाच विचार मनात ठेवून आयुष्य कसं आनंदाने जगायला हवे हेच या पुस्तकातून लेखकाने सहजसोप्या भाषेत समजावून सांगितले आहे. एक कथा म्हणून घ्या किंवा अध्यात्मिक मार्गावरील मार्गदर्शनपर पुस्तक म्हणून घ्या पण प्रत्येकालाच हे पुस्तक कालिंदीचा हा प्रवास नक्कीच सकारात्मक ऊर्जा देणारा, जगण्यासाठी प्रेरणा देणारा असा ठरतो. आपणही सर्वांनी हा अनुभव नक्कीच घ्यावा. कुंटे “स्वामी” अर्थात श्री. जगन्नाथ कुंटे यांच्याबद्दल लिहिण्याचा माझा अधिकार नाहीये. पण त्यांची पुस्तकं वाचून जे काही थोडे फार ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न करते आहे त्यासाठी स्वामींप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि माझ्यासारखंच इतरांनीही त्यांच्या पुस्तकांमधून ज्ञान मिळवावं ह्या इच्छेनेच हा परिक्षणाचा प्रयत्न या लेखनातून केला आहे.

धन्यवाद.

सौ. कोमल केळकर. विरार.

# गूज . . .

छंदात बांधते मी हे भाव शब्द सारे ,
उमलू हळूच लागे ही अबोल स्तब्धता रे ।।धृ।।

पाने कळ्या पहाटे हलकेच श्वास घेती ,
दवबिंदुही हळूच अवनी कुशीत घेते ,
हे जाणुनीच समीर मग मंदसा सुवासे ,
उमलू हळूच लागे ही अबोल स्तब्धता रे ।।१।।

चैत्रातल्या दुपारी कुहु कुहु हळूच बोले ,
राईत मग चैतन्य बसुनी फुलूनी बोले ,
पिल्लांस कुशीत घेती पक्षी समस्त सारे ,
उमलू हळूच लागे ही अबोल स्तब्धता रे ।।२।।

कधी सांजवेळी करकरीत आषाढ शांत करतो ,
दाटून येते नभ हे कल्लोळ मनी उठतो ,
सर येत पावसाची तन मन हे चिंब करते ,
लोटून ही निराशा पुलकीत मी रे होते
पसरून मनपिसारा
हा मोर गवसला रे
उमलू हळूच लागे ही अबोल स्तब्धता रे ।।३।।

शरदेचे चांदणे हे मज चकित मुग्ध करते ,
ही ओढ आसमानी सर्वत्र
बघ पसरते ,
ओढून पैठणी ही सृष्टीच
विहरते रे ,
उमलू हळूच लागे ही अबोल स्तब्धता रे ।।४।।

वसुधा विजय केळकर, वडोदरा

Designed & Printed by - Vidya Mudran Mandir, Vidyadhar Keshav Kelkar, ☎ 9757142636 / 8369093247